**जिल्हा नियोजन मंडळ यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या "चारा उत्पादन कार्यक्रमांतर्गत चारा बियाणे/ ठोंबे पुरवठा योजना", अंतर्गत तांत्रिक मंजूरी प्रदान करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन पूरक निर्णय क्रमांक- संकिर्ण-२०१८ / प्र.क्र. ३१(भाग-१) /पदुम-४**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- १५ जून, २०२६

वाचा :
१. समक्रमांकाचा शासन निर्णय दि. ०१.०६.२०२३
२. दि. १६.०४.२०२६ व दि. १३.०६.२०२६ रोजी मा. सचिव पशुसंवर्धन यांच्या अध्यक्षतेखालील आढावा बैठकी

**शासन पूरक निर्णय** :-

शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०१८/प्र.क्र. ३१ (भाग-१) / पदुम-४, दि ०१.०६.२०२३.अन्वये पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद यांच्यामार्फत जिल्हा नियोजन मंडळ, राज्यस्तरीय योजना, केंद्र पुरस्कृत योजना व अन्य विभागाकडून प्राप्त होणाऱ्या निधीमधून राबविण्यात येणाऱ्या योजनांना तांत्रिक मंजूरी प्रदान करण्याबाबतचे अधिकार संबंधित जिल्हयाचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, संबंधित प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन आणि आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांना विहित करण्यात आले आहेत .

२. वरील योजनांपैकी जिल्हा नियोजन मंडळ यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या "चारा उत्पादन कार्यक्रमांतर्गत चारा बियाणे/ ठोंबे पुरवठा योजना", अंतर्गत चारा पिके घेण्यासाठी बियाणे वाटप करण्यात येते. बियाणे वाटप योजनेत वाटप करण्यात येणारे चारा बियाणे हे त्या-त्या जिल्ह्यातील भौगोलिक वातावरण विचारात घेऊन चारा पिकांची निवड करणे आवश्यक ठरते. सदर बाब ही स्थानिक वातावरणाशी संबंधित असल्याने जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत संबंधित जिल्ह्याच्या वार्षिक बियाणे वाटप योजनेच्या आराखड्यातील रक्कम / मंजूर निधी मर्यादेपर्यंत तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार संबंधित जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन यांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार या शासन पूरक निर्णयान्वये प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

योजनेच्या निकषाप्रमाणे प्रस्तावाची तपासणी करुन तांत्रिक मंजुरी देण्याची संपुर्ण जबाबदारी तांत्रिक मंजुरी देणाऱ्या संबंधित जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन यांची राहील.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असुन त्याचा सांकेतांक २०२६०६१५१५१०२५४००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

MARALE NIWRUTTI BHAGUJI

Digitally signed by MARALE NIWRUTTI BHAGUJI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept, 2.5.4.20=8A75C414FF50CE35220C63CD53D2EB1A99A474C02300BEEA74BB051C4C3C90A9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=MARALE NIWRUTTI BHAGUJI
Date: 2026.06.15 15:11:18 +05'30'

**(श्री. नि. भा. मराळे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई
२. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई
३. मा.मंत्री (पशुसंवर्धन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
४. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
६. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन,
७. प्रधान महालेखापाल (लेखापरिक्षा) -१/२ महाराष्ट्र, मुंबई / नागपुर.
८. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) -१/२ महाराष्ट्र, मुंबई / नागपुर.
९. सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त,
१०.ग्राम विकास विभाग (वित्त-९),बांधकाम भवन, मर्झबाण रोड, मुंबई
११.जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व
१२.निवडनस्ती पदुम-४